**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका उपक्रम)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२, मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.१२
दिनांक : २०.०९.२०२१

"वीजदेयकाचे ऑनलाईन प्रदान करणा-या वीजग्राहकांचा बक्षिस वितरण सोहळा"

मुंबई, २० – निसर्ग संवर्धनाच्या दृष्टीने तसेच वीजग्राहकांच्या वेळेची बचत व्हावी म्हणून वीजदेयकाचे ऑनलाईन प्रदान करणा-या बेस्टच्या वीजग्राहकांचा लकी ड्रॉ काढून बेस्ट समिती अध्यक्ष मान. श्री.आशिष चेंबूरकर यांच्या शुभहस्ते विजेत्या वीजग्राहकांना आज दिनांक २०.०९.२०२१ रोजी कुलाबा आगार येथे बक्षिसे देण्यात आली. यावेळी बेस्ट समिती सदस्य श्री. विष्णू कनावजे, बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक श्री. लोकेश चंद्र तसेच बेस्टचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. सदर लकी ड्रॉमध्ये प्रत्येक प्रभागातील एक याप्रमाणे नऊ वीजग्राहकांची संगणकप्रणालीद्वारे निवड करुन त्यांना खालीलप्रमाणे बक्षिसे देण्यात आली.

| प्रभाग | वीजग्राहकाचे नाव | बक्षीस |
|---|---|---|
| ए | सुरेश पुरी | पॅनासॉनिक वाशिंग मशिन |
| बी | भिकू सेवरा | न्युट्रिब्लेंड वंडर शेफ |
| सी | रेखा म्हात्रे | रेड मी ९ए मोबाईल |
| डी | एफ.जे.परडीवाला | न्युट्रिब्लेंड वंडर शेफ |
| इ | फर्नांडीस ब्लॅन्ची रोमिओ | बजाज फुड प्रोसेसर |
| जी एस | बाबासाहेब जानबा पाटील | न्युट्रिब्लेंड वंडर शेफ |
| जी एन | उमा सुधीर केळुस्कर | सॅमसंग ३ स्टार फ्रिज |
| एफ एस | संध्याकिरण सहदेव गुरव | न्युट्रिब्लेंड वंडर शेफ |
| एफ एन | सुंदरी वेंकट | सेलो डिनर सेट |

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना श्री. लोकेश चंद्र असे म्हणाले की, वीजग्राहकांनी घरबसल्या वीजदेयकाचे प्रदान ऑनलाईन केल्यास त्यांच्या वेळेची आणि प्रवासखर्चाची बचत होईल. त्यांना miBEST या ॲपद्वारे तसेच बेस्ट उपक्रमाच्या वेबसाईटद्वारे वीजदेयकाचे प्रदान आणि तक्रार करता येऊ शकते, याशिवाय तत्पर प्रदान आणि ऑनलाईनद्वारे प्रदान याकरिता बेस्ट उपक्रमाने प्रोत्साहन बोनस देखील सुरु केलेला आहे. या सर्व सुविधांचा वीजग्राहकांनी अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन देखील त्यांनी केले. सदर उपक्रमाचा प्रसार करणा-या व्यक्तींस बेस्ट उपक्रमामार्फत एका वीजग्राहकामागे रुपये १०/- इतकी प्रोत्साहन रक्कम देण्याचे प्रस्तावित असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले .

....

Scanned by CamScanner